निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३१९ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * बुधवार दि.२५ मार्च २०२६ | * पाने-४


## अशोक खरातला ज्यांनी कुणी मदत केली त्या कुणालाही सोडण्यात येणार नाही

### देवेंद्र फडणवीसांची विधानसभेत ग्वाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – आपण दैवी अवतार असल्याचं सांगत अशोक खरातने महिलांचे शोषण केलं, त्यांच्या योनीत बोट घालत अत्याचार केला, महिलांना तीर्थाच्या नावाखाली लघवी पाजली, अशी हादरवणारी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला दिली. या प्रकरणात एकूण आठ गुन्हे दाखल असून अशोक खरातला ज्यांनी कुणी मदत केली त्या कुणालाही सोडण्यात येणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. या प्रकरणात आणखी तपास सुरू असून त्याची वेळोवेळी माहिती दिली जाईल असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्र्यांनी दिलेले निवेदनात म्हटले आहे की, अशोक खरात प्रकरणात आरोपीने महिलेचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पाच कोटी मागितले होते. या प्रकरणात नाशिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी नीरज जाधव याने एआय फोटो व्हायरल केला नंतर डिलीट केला. त्यामुळे संबंधित महिलेला नीरज जाधवच्या विरोधात पुरावा देता आला नाही. परंतु या प्रकरणातील पीडित महिलांना विश्वासात घेऊन, त्यांचे समुपदेशन करून, कोणतीही ओळख सार्वजनिक न करता गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. त्या माध्यमातून तपास सुरू आहे.

सरकार वाडा पोलीस स्टेशनमध्ये एका महिलेने तक्रार केली. या महिलेला गुंगीचे औषध देऊन, तिच्या नवऱ्याला मारून टाकेन अशी धमकी देत वारंवार बलात्कार करण्यात आला. अशोक खरात हा महिलांना संमोहित करायचा. विधीच्या नावाखाली त्यांच्या पोटावरून हात फिरवायचा, त्यांच्या योनीत बोट घालायचा. तीर्थाच्या नावाखाली त्यांना लघवी पाजायचा. तसेच आपण दैवी अवतार असल्याचं सांगत या प्रकरणाची वाच्यता कुठे केल्यास दैवी कोप होईल अशी धमकी द्यायचा.

या गुन्ह्याचा प्राथमिक तपास करत असताना ६ लाख रोकड, दोन लॅपटॉप जप्त करण्यात आले. डीव्हीआर, रिव्हॉल्वर, जिवंत काडतुसे आणि फायर केलेले पाच काडतुसे मिळाली. त्यानुसार १७ मार्च रोजी आरोपीला अटक करण्यात आली.

या प्रकरणात आणखी काही पीडित महिलांची ओळख पटवण्यात आली, त्यांचे समुपदेशन करून त्यांना तक्रार देण्यात तयार करण्यात आलं. पिडीत महिलांचे फोटो, व्हिडीओ फेसबुक तसेच सोशल मीडियावरून डिलीट करण्याचं काम सुरू आहे.

अशोक खरातची ३३ एकर जमीन, फार्म हाऊस, आणि इतर ठिकाणी जमिनी, फ्लॅट, पनवेल येथील ४० गुंठे जमीन, मुलीच्या नावावर असलेला पुण्यातील फ्लॅट, सिन्नर येथे मंगल कार्यालय जप्त करण्यात आलं आहे. आतापर्यंत ४० कोटी रुपयांची मालमत्ता समोर आली आहे. तसेच अशोक खरातच्या नातेवाईकांच्या नावावर असलेली मालमत्ता या संदर्भात चौकशी सुरु आहे.

आरोपीच्या शिवनिका संस्थानची चौकशी करण्यायत येत आहे. या प्रकरणातील पीडित आणि आरोपी यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत असलेले पुजारी आणि इतर लोकांचेही जबाब घेतले आहेत. चार पीडित महिलांचे जबाब घेऊन पाच गुन्हे दाखल केले आहेत. असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदत पुरवा; विजय वडेट्टीवार यांची विधानसभेत मागणी

### चंद्रपूरच्या ६ बेपत्ता मुलींकडेही वेधले सरकारचे लक्ष



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – राज्यात सध्या कायदा–सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. एकीकडे अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. तर दुसरीकडे, मराठवाड्यातील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना सरकार केवळ भोंदू बाबांच्या मागे लागले आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत सरकारवर निशाणा साधताना केली.


विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडत असताना वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरीसह राज्यातील सुरक्षिततेच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, ब्रह्मपुरी शहरात गेल्या काही दिवसांत १० वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक घडली आहे. यापैकी केवळ २ मुलींचा तपास लागला असून ४ मुली अजूनही बेपत्ता आहेत. सरकार सीसीटीव्हीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते, मग तालुका स्तरावर या व्यवस्था कुठे आहेत? मुलींचे अपहरण होत असताना आणि त्यांचे मोबाईल बंद असताना पोलिस यंत्रणा काय करत आहे? शाळा – महाविद्यालयांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेबाबत प्रबोधन करण्याची गरज आहे. या प्रकरणी सरकारने बेपत्ता मुलींचा शोध घेण्यासाठी तत्काळ विशेष पथकाची नियुक्ती करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी राज्यात झालेल्या अवकाळी पावसाचाही मुद्दा मांडला. ते म्हणाले, राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे हजारो हेक्टरवरील रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. नांदेड, हिंगोली, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील स्थिती अत्यंत गंभीर आहे. या नैसर्गिक आपत्तीत ४१ जनावरे दगावली असून २ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शेतकरी अडचणीत असताना सरकार केवळ कर्जमाफीच्या पोकळ गप्पा मारत आहे.

अद्याप अनेक ठिकाणी पंचनामेही सुरू झालेले नाहीत. सरकारने तात्काळ निवेदन करून बाधित शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली. राज्यात शेतकरी मरत आहे, मुली सुरक्षित नाहीत, पण सरकार मात्र भोंदू बाबांच्या मागे धावण्यात धन्यता मानत आहे. पालकांचा आक्रोश सरकारला ऐकू येत नाही का? असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

## भारताचे परराष्ट्र धोरण म्हणजे मोदींचा 'पर्सनल प्रोजेक्ट'

### पश्चिम आशियातील तणावावरून राहुल गांधींची बोचरी टीका




**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा आणि राज्यसभेत युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी युद्धकाळात सरकारकडून सुरू असलेल्या उपाययोजनांविषयी माहिती दिली. या भाषणावर आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सडकून टीका आहे. देशाचं परराष्ट्र धोरण हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं पर्सनल धोरण असून त्याला युनिवर्सल जोक म्हटलं आहे. संसदेच्या बाहेर ते माध्यमांशी बोलत होते.

''आपलं जे परराष्ट्र धोरण आहे ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं वैयक्तिक धोरण आहे. याचा निकाल तुम्ही पाहू शकता. हा युनिवर्सल जोक आहे. प्रत्येकजण याला युनिवर्सल जोक मानत आहे'', असं राहुल गांधी म्हणाले.

''पंतप्रधान नरेंद्र मोदी काय करू शकतात आणि काय करू शकत नाहीत, हे डोनाल्ड ट्रम्प यांना चांगलं माहितेय. त्यामुळे पंतप्रधान तडजोड करतात तेव्हा आपल्या परराष्ट्र धोरणातही तडजोड होते. हे सर्वांना दिसतंय'', अशी टीकाही त्यांनी केली.

''मोदींनी युएस डिल केलं. काल असंबंधित भाषण केलं. भारताचे पंतप्रधान आहेत ते. भारताचे पंतप्रधान वाटले पाहिजे ते. दु:खाची बाब आहे की यामुळे लोकांना नुकसान होणार आहे. आता तर सुरुवात झाली आहे. एलपीजी, पेट्रोल, फर्टिलायजर या प्रत्येक गोष्टीत संकट येणार आहे. कोविडसारखी वेळ येणार आहे, असं मोदी म्हणाले. कोविडमध्ये जे केलं होतं, ते हे विसरले आहेत. किती लोक मेले होते? काहीच समजत नाही'', असंही ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्या इराण युद्धावर चर्चा करण्याकरता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे, यावर राहुल गांधी म्हणाले, ''सर्वपक्षीय बैठकीत मी नसेन. तेव्हा मी केरळात आहे. पण सर्वपक्षीय बैठक झाली पाहिजे. चर्चा झाली पाहिजे. पण तुम्ही पूर्ण ढाचाच उडवला आहे, तो तुम्ही व्यवस्थित नाही करू शकत. हे मोदी करूच शकत नाही. कारण, मोदी जे अमेरिका आणि इस्रायल सांगणार तेच करणार. मोदी शेतकरी, सामान्य लोकांच्या हिताचं करणार नाहीत, जे अमेरिका आणि इस्रायल सांगणार तेच करणार.'' असे राहुल गांधी म्हणाले.

## नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातच्या पोलीस कोठडीत २९ मार्चपर्यंत वाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक** –महिलांच्या लैंगिक शोषण प्रकरणी भोंदूबाबा अशोक खरातच्या पोलीस कोठडीत नाशिक येथील न्यायालयाने २९ मार्चपर्यंत वाढ केली आहे. सरकारी पक्षातर्फे न्यायालयात अनेक धक्कादायक बाबी मांडून अधिक तपासासाठी पोलीस कोठडीत मागणी करण्यात आली. मंगळवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात खरातला न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी काही जण खरातवर हल्ला करण्याच्या प्रयत्नात होते. पोलिसांनी त्यांना वेळीच ताब्यात घेतले.

महिला अत्याचार प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून केला जात आहे. युवतीवर लग्नाआधी आणि लग्नानंतर अशोक खरातने त्याच्या कार्यालयात अत्याचार केले. या विरोधात पीडितेने सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी खरातला अटक झाल्यानंतर त्याचे कारनामे समोर येऊ लागले. खरातच्या अत्याचाराला बळी पडलेल्यांनी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन पोलिसांनी केल्यानंतर पीडिता तक्रारीसाठी पुढे येऊ लागल्या.

गर्भवती महिलेवर बाळाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पूजा करण्याच्या बहाण्याने अत्याचार करण्यात आले. एका प्रकरणात लग्नाचे आमिष दाखवून घटस्फोटीत महिलेवर अत्याचार करण्यात आले. त्यानंतर तीन पीडितांनी यासारखीच पोलिसांकडे कैफियत मांडली. या प्रकरणी आतापर्यंत खरातविरुद्ध एकूण सहा गुन्हे दाखल झाले आहेत.

पहिल्या गुन्ह्यात न्यायालयाने सुनावलेल्या पोलीस कोठडीची मुदत मंगळवारी संपुष्टात आली. विशेष तपास पथकाने संशयित खरातला दुपारी न्यायालयात हजर केले. सरकारी पक्षाच्यावतीने तपासात समोर आलेल्या बाबी न्यायालयासमोर मांडल्या. संशयित खरातकडे हरणाची काळी व पांढरी कस्तुरी सापडली. त्याने ती कुठून आणली याचा तपास करावयाचा आहे.

संशयिताकडे पिस्तुल, २१ जिवंत काडतुसे आणि पाच रिकाम्या पुंगळ्या जप्त करण्यात आल्या.

पिस्तुलीचा वापर संशयिताने नरबळी देण्यासाठी केल्याचा संशय व्यक्त करीत या सर्व बाबींचा सखोल तपास होण्यासाठी पोलीस कोठडीत वाढविण्याची मागणी सरकारी पक्षाकडून करण्यात आली. खरातच्या वकिलांनी त्यास विरोध केला. यावर दोन्ही बाजुकडून जोरदार युक्तिवाद झाल्यानंतर न्यायालयाने खरातची पुन्हा २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

## टास्क फोर्सच्या अहवालानंतर सोशल मीडिया वापरावरील नियंत्रणाबाबत धोरण ठरणार–मंत्री ॲड. आशिष शेलार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – राज्यातील अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्याबाबत शासनाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या अहवालानंतरच ठोस धोरण किंवा कायदा तयार केला जाईल, अशी माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत सदस्य राजेश पवार यांनी सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे अल्पवयीन मुलांवर होणाऱ्या परिणामांबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती.

मंत्री ॲड. शेलार म्हणाले, इतर राज्यांनी सोशल मीडिया वापर बंदीसंबंधी केवळ घोषणा केल्या असून, ठोस कायदे अद्याप अस्तित्वात आणलेले नाहीत. मात्र, महाराष्ट्राने या विषयाकडे गांभीर्याने पाहत २ फेब्रुवारी २०२६ रोजी टास्क फोर्स स्थापन केला आहे. या टास्क फोर्सकडून अल्पवयीन मुलांचा सोशल मीडिया वापर, त्याचे मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम तसेच डिजिटल जाहिरातींचा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचा अभ्यास करून योग्य कायदेशीर, तांत्रिक व प्रशासकीय उपाय सुचवले जाणार आहेत.

१८ वर्षांखालील युवाशक्तीच्या सोशल मीडिया किंवा मोबाईल वापरावर सरसकट बंदी घालणे योग्य ठरणार नाही, कारण शिक्षण व्यवस्थेत इंटरनेटचा महत्त्वाचा उपयोग आहे. त्यामुळे संतुलित दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. टास्क फोर्सला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, त्याच्या अहवालानंतर राज्य शासन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियामक चौकटीचा अभ्यास, माहिती तंत्रज्ञान कायदे सुधारणा, एज व्हेरिफिकेशन, स्क्रीन टाइम लिमिट, तसेच शाळांमध्ये डिजिटल सेफ्टी शिक्षण यासारख्या उपाययोजनांवर निर्णय घेईल. तसेच विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांसाठीही डिजिटल सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम राबवण्याबाबत विचार सुरू असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य समाधान आवताडे यांनी सहभाग घेतला.

## किनवट नगर परिषदेची मोठी कारवाई; थकबाकीदारांचे दोन गाळे सील

### ३० मार्चपर्यंत कर भरणा करण्याचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांचे आवाहन; अन्यथा जप्तीची मोहीम तीव्र करणार

* **आत्ताच एक्सप्रेस**

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – नगर परिषद प्रशासनाने थकबाकीदारांविरुद्ध आता कंबर कसली असून, वारंवार सूचना देऊनही कर भरणा न करणाऱ्या मालमत्ता धारक, गाळेभाडे, जमीन भाडे, पाणी पट्टी धारकांवर ठोस कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. आज, २४ मार्च रोजी शहरात मोठी कारवाई करत नगर परिषदेने दोन व्यावसायिक गाळे सील केले आहेत. या धडक कारवाईमुळे थकबाकीदारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.





जमीन भाडे, गाळे भाडे, मालमत्ता कर आणि पाणी पट्टीचा भरणा न करणाऱ्यांविरुद्ध नगर परिषद किनवट सध्या ॲक्शन मोडवर आहे. आजच्या मोहिमेत शहरातील दोन मोठ्या थकबाकीदारांचे गाळे जप्त करून त्यांना सील ठोकण्यात आले. आर्थिक वर्ष संपण्यास काहीच दिवस शिल्लक असल्याने प्रशासनाने वसुलीसाठी आक्रमक पाऊल उचलले आहे.

या कारवाईबाबत बोलताना नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री. मुगाजी काकडे यांनी स्पष्ट केले की, ''नागरिकांनी कटू कारवाई टाळण्यासाठी ३० मार्च २०२६ पूर्वी आपल्याकडील सर्व थकीत पाणीपट्टी, मालमत्ता कर, गाळे भाडे आणि जमीन भाड्याचा भरणा करून नगर परिषदेला सहकार्य करावे. जे नागरिक मुदतीत कर भरणार नाहीत, त्यांच्या मालमत्ता जप्तीची मोहीम अधिक तीव्र केली जाईल.या धडक मोहिमेत नगर परिषदेचे कर विभाग प्रमुख श्री. घुले, श्री संमुखराव,श्री स्वानंद मामीलवाड,श्री कैतवाड, राजु पिल्लेवार,परमेश्वर कचमोडे, अनिल माहूरकर, गंगाधर दोनपेलीवार यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी व पथक उपस्थित होते. आगामी आठवड्यात ही मोहीम शहरातील विविध भागांत राबवली जाणार आहे. जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी आजच आपला कर भरून सहकार्य करण्याचे आव्हान नगर परिषद किनवट ने केले आहे.

# अविश्वासाच्या पिंजऱ्यात

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना हटवण्यासाठी विरोधकांनी सूचना दाखल केली आहे. कुमार हे विरोधकांच्या 'अविश्वासा'च्या पिंजऱ्यात असले तरी एकूण ही प्रक्रिया खूपच दीर्घ चालणारी आहे. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना पदावरून हटविण्यासाठी संसदेतील विरोधी पक्षांनी लोकसभा व राज्यसभेत एकाच दिवशी सूचना (नोटीस) दाखल केली आहे. लोकसभेत दाखल केलेल्या सूचनेवर सभागृहातील १३० खासदारांच्या, तर राज्यसभेत दाखल केलेल्या सूचनेवर सभागृहातील ६३ खासदारांच्या सह्या आहेत. या सूचनेवर लोकसभेच्या कमीतकमी शंभर व राज्यसभेच्या कमीतकमी पन्नास सदस्यांच्या सह्या असणे आवश्यक असते. या निकषावर विरोधी पक्षाने पहिली फेरी पार केली आहे. ही सूचना लोकसभेत व राज्यसभेत वा कुठच्याही एका सभागृहात स्वीकारली गेल्यास कायदेशीर तरतुदीनुसार पुढील कारवाई सुरू होईल. मुख्य निवडणूक आयुक्तांवर सात विविध आरोप करण्यात आले असून त्यांच्या निष्पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. अशा प्रकारचे हे पहिलेच प्रकरण. याआधी सन २००६ मध्ये एनडीएने तत्कालीन निवडणूक आयुक्त (मुख्य नव्हे) नवीन चावला यांना दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त व राष्ट्रपतींना निवेदन दिले होते; पण मुख्य निवडणूक आयुक्तांची शिफारस डावलून सरकारच्या शिफारशीवरून राष्ट्रपतींनी कारवाईस नकार दिला होता. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि पदावधी) कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व घटनेच्या अनुच्छेद (कलम) ३२४ (५) मधील तरतुदीनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना ज्या रीतीने आणि ज्या कारणांवरून पदावरून दूर केले जाते, त्याच रीतीने आणि त्याच कारणांवरून मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरून दूर करता येऊ शकते. घटनेच्या कलम ३२४ (५) व या कायद्याच्या कलम ११ (३) नुसार इतर निवडणूक आयुक्तांना काढून टाकताना ही पद्धत अवलंबली जात नसली तरी, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशीशिवाय त्यांना पदावरून दूर करता येत नाही. घटनेच्या कलम १२४(४) नुसार संसदेच्या दोन्ही सभागृहांनी सभागृहाच्या सदस्य संख्येच्या बहुमताने आणि उपस्थित सदस्यांच्या दोन तृतीयांश मताने मंजूर करून राष्ट्रपतींना दिलेल्या विनंती अर्जानंतर सिद्ध झालेली गैरवर्तणूक आणि अक्षमता या दोन कारणांनी राष्ट्रपतींनी काढलेल्या आदेशाने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून काढता येते. परंतु, असा ठराव संसदेत चर्चेला येण्यापूर्वी घटनेच्या कलम १२४(५) नुसार सरकारने केलेल्या न्यायमूर्ती (तपास) कायदा १९६८ व न्यायमूर्ती तपास नियम १९६९ नुसार चौकशी समिती नेमून तिचा अहवाल यावा लागतो. याचा अर्थ असा, की या प्रकरणात आयुक्तांना अशा चौकशी समितीला सामोरे जावे लागेल व चौकशी समितीसमोर सिद्ध झालेली गैरवर्तणूक आणि अक्षमता या दोन निकषांवर किंवा एका निकषावर आयुक्त दोषी ठरावयास हवेत. संबधित सूचना लोकसभा अध्यक्ष व राज्यसभा सभापती या दोघांनी स्वीकृत केल्यास ते संयुक्तपणे या आरोपांची चौकशी करण्यासाठी भारताचे सरन्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्यापैकी एक, उच्च न्यायालयाचे एक मुख्य न्यायाधीश व एक प्रतिष्ठित कायदेतज्ज्ञ यांची समिती नेमतील. सूचना दोन्हीपैकी एका सभागृहात स्वीकृत झाल्यास त्या सभागृहाचे पीठासीन आधिकारी अशी समिती नेमतील. ठराव दोन्ही सभागृहात अस्वीकृत झाल्यास या प्रस्तावाचे संसदीय आयुष्य समाप्त होईल. कदाचित प्रकरण न्यायालयात पोचेल. ही चौकशी अतिशय संवेदनशील असते. नैसर्गिक न्यायतत्त्वांचे त्यात कटाक्षाने पालन केले जाते आणि साक्षीदारांची तपासणी आणि उलटतपासणी होते. संबंधित व्यक्तीला आपले मत मांडण्याची न्याय्य व पुरेशी संधी दिली जाते. त्यांना वकिलांमार्फत मत मांडण्याचीही मुभा असते व ते दोषी आढळले नाहीत तर समितीच्या शिफारसीनुसार वकिलाच्या खर्चाची भरपाई केंद्र सरकार करते. संबंधित व्यक्ती दोषी आढळल्यास त्या अहवालावर संसदेत चर्चा होऊन ठराव मंजूर झाल्यावर त्या व्यक्तीला काढून टाकण्याची कारवाई राष्ट्रपती करतात. या ठरावाच्या वेळी संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी दिली जाते. घटनात्मक पदावरील व्यक्तीस काढून टाकण्याबाबत आपल्या घटनाकारांनी फार जाणतेपणाने व विचारपूर्वक कठोर निकष निश्चित केले आहेत. प्रातिनिधिक लोकशाही स्वीकारलेल्या आपल्या व्यवस्थेत घटनेने मुख्य निवडणूक आयुक्तांना अनेक कठीण कर्तव्ये व अधिकार असल्यामुळे फार उंच पायरीवर बसवलेले आहे; पण त्याचबरोबर हे पद सार्वजनिक विश्वासाचे असल्याने गैरवर्तणूक सिद्ध झाल्यास नागरिकांना आपल्या प्रतिनिधींमार्फत त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याचा आधिकारही आहे, या कारवाईसाठी पुरावे मात्र ठोस असावयास हवेत. या समितीला दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार साक्षीदारांची तपासणी करणे, कागदपत्रांची मागणी करणे इत्यादी अधिकार असतात. समितीला आयुक्त दोषी आढळले नाहीत तर संसदेच्या दोन्ही सभागृहांत कोणतीही पुढील पावले उचलली जात नाहीत व प्रस्ताव रद्द होतो. आयुक्त दोषी आढळले तर मात्र संसदेत त्यावर चर्चा होऊन तो मंजूर वा नामंजूर होतो. तो मंजूर झाल्यास गैरवर्तणूक सिद्ध झाली असे होऊन पुढील कारवाई राष्ट्रपती करतात. जर चौकशी समितीच्या सदस्यांना बहुमताने आयुक्त दोषी आढळले नाहीत; पण तिसऱ्या सदस्यांना ते दोषी आढळले तर त्या तिसऱ्या सदस्याचा अहवाल संसदेस वा अन्य कोणास उघड केला जात नाही. न्यायमूर्ती (तपास) कायदा किंवा नियमात 'सिद्ध झालेली गैरवर्तणूक' म्हणजे काय याची व्याख्या दिलेली नाही. घटना समितीमध्येही 'सिद्ध झालेली गैरवर्तणूक' याबाबत फारशी चर्चा झाली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, संसद जो कायदा करेल त्यात याची काळजी घेतली जाईल असे म्हटले होते; पण तसे आजतागायत झालेले नाही. विधि आयोगानेही आपल्या १९५व्या अहवालात, याची व्याख्या करण्यात यावी, अशी शिफारस केली होती. न्यायमूर्ती सौमित्र सेन यांच्याबाबत नेमलेल्या समितीने असे म्हटले आहे, की गैरवर्तणूक हा शब्द चांगल्या वर्तणुकीच्या विरुद्ध अर्थी आहे. उच्च घटनात्मक पदावर जनतेचा विश्वास असतो आणि आपल्या लोकप्रतिनिधींमार्फत तो उडाला आहे, असे म्हणण्याचा तिला अधिकार आहे. मात्र, सिद्ध गैरवर्तणुकीनंतरच हे शक्य आहे. सिद्ध झालेली याचा अर्थ समितीने शिफारस केलेली व संसदेच्या संबंधित सभागृहाच्या आवश्यक बहुमताचे समाधान झालेली वर्तणूक. मुळात सूचना स्वीकृत होणे (त्यासाठी वेळेचे कायदेशीर बंधन नाही), त्यानंतर चौकशी समिती नेमणे, तिचा अहवाल येणे, त्यात आयुक्त दोषी आढळणे, त्यानंतर दोन्ही सभागृहांत चर्चा होणे आणि ठराव मंजूर होणे यासाठी लागणारा वेळ आणि न्यायमूर्ती वर्मा प्रकरणात लोकसभा अध्यक्षांनी नेमलेल्या समितीचा अहवाल अजून आलेला नाही; तसेच या निर्णयाविरुद्ध न्यायालयात जाण्याचा अधिकार आयुक्तांना आहे, हे लक्षात घेऊन हे प्रकरण किती वेळ घेईल हे सांगणे शक्य नाही. दुसरे असे, की लोकसभा व राज्यसभेतील पक्षीय बलाबल पाहता अंतिमतः हा ठराव मंजूर होणार नाही, असे स्पष्ट दिसत असले तरी सूचना स्वीकृत झाल्यास निदान आरोपांची चौकशी होईल व संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा घडवून आणून पश्चिम बंगालमधील निवडणुकीपर्यंत किंवा त्यानंतरही वातावरण तप्त ठेवता येईल, हाही विरोधी पक्षांचा उद्देश असू शकतो. त्यात ते सफल होतात का, हे येत्या काळात कळेलच.

# दीर्घकालीन युद्धाची सावली



इराण-अमेरिकेतील संघर्ष केवळ शस्त्रांचा किंवा सामर्थ्याचा नाही, तर राजकारण, भू-राजनीती आणि जागतिक व्यवस्थेचा प्रश्न आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धात कोणताही देश पूर्ण विजय मिळवत नाही. उलट, अशा संघर्षांमुळे प्रदेश अस्थिर होतो, अर्थव्यवस्था डळमळते आणि मानवी हानी वाढते. या संघर्षाचे खरे उत्तर रणांगणावर नसून कूटनीतीच्या मार्गात आहे. अन्यथा, एका दीर्घ खर्चिक युद्धाची सावली संपूर्ण जगावर पडू शकते.

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी चकमकींपुरता मर्यादित नाही. या संघर्षात दोन्ही बाजूंनी लढाई दीर्घकाळ सुरू ठेवण्याचा व्यक्त केलेला निर्धार, त्यामागील सामरिक गणित, भूतकाळातील अनुभव आणि जागतिक परिणाम यांचा विचार केल्यास हा प्रश्न केवळ प्रादेशिक राहात नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्यावर परिणाम करणारा ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशाकडे प्रचंड शस्त्रसाठा असल्याचा दावा करत युद्ध दीर्घकाळ चालवण्याची क्षमता असल्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे, इराणनेही किमान सहा महिने युद्ध सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या दोन घोषणांमधून स्पष्ट होते की संघर्ष तात्पुरता किंवा मर्यादित राहील, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरू शकते. आधुनिक युद्धात निर्णायक विजय पटकन मिळत नाही; उलट दीर्घकालीन संघर्ष हीच अधिक सामान्य बाब बनली आहे. लष्करी शक्तीच्या दृष्टीने पाहता अमेरिका जगातील सर्वात सामर्थ्यशाली राष्ट्र मानले जाते. तिच्याकडे अत्याधुनिक हवाई दल, नौदल, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि जगभर पसरलेले लष्करी तळांचे जाळे आहे. याउलट इराणकडे अमेरिकेसारखी प्रचंड पारंपरिक लष्करी क्षमता नसली, तरी त्याने असिमित युद्धतंत्र विकसित केले आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान, प्रादेशिक मित्रगट आणि समुद्री मार्गांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या माध्यमातून तो आपल्या तुलनेने कमी साधनसामग्रीतूनही मोठ्या शक्तीला आव्हान देऊ शकतो. म्हणूनच या संघर्षात सरळ लष्करी तुलना केल्यास अमेरिका वरचढ वाटते; पण दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षात इराणची प्रतिकारक्षमता दुर्लक्षित करता येत नाही.

अमेरिकेच्या लष्करी इतिहासाकडे पाहिले असता एक महत्त्वाची बाब लक्षात येते. प्रचंड शक्ती असूनही तिला काही वेळा तुलनेने लहान किंवा कमी शक्तिशाली राष्ट्रांविरोधात अपेक्षित यश मिळालेले नाही. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. तांत्रिक आणि लष्करी वर्चस्व असूनही अमेरिकेला दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर माघार घ्यावी लागली. त्याचप्रमाणे अफगाणिस्तानमध्ये दोन दशके ठाण मांडूनही शेवटी अमेरिकेवर माघारीची नामुष्की ओढवली. ही उदाहरणे दर्शवतात, की आधुनिक युद्धात फक्त शस्त्रांची संख्या किंवा तांत्रिक प्राबल्य निर्णायक ठरत नाही, तर राजकीय इच्छाशक्ती, स्थानिक भूगोल, जनसमर्थन आणि दीर्घकालीन रणनीती हे घटक तितकेच महत्त्वाचे असतात. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास दोन्ही देशांना किंमत चुकवावी लागेल. अमेरिकेसाठी सर्वात मोठा प्रश्न आर्थिक आणि सामरिक संसाधनांचा असेल. जगभर अनेक लष्करी जबाबदाऱ्या सांभाळताना आणखी एक मोठा संघर्ष टिकवून ठेवणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. इराणसाठीही परिस्थिती सोपी नाही. आंतरराष्ट्रीय निर्बंध, मर्यादित आर्थिक साधने आणि आधीच दबावाखाली असलेली अर्थव्यवस्था यामुळे दीर्घ युद्ध देशांतर्गत संकटे वाढवू शकते. म्हणजेच, या संघर्षात जिंकणारा कोणी असला, तरी तो पूर्णपणे निष्कलंक राहणार नाही. दोन्ही बाजूंना मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय किंमत मोजावी लागेल. या संघर्षाचा परिणाम केवळ मध्य पूर्वेपुरता मर्यादित राहणार नाही. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.

मध्य पूर्व हा तेलपुरवठा करणारा जगातील सर्वात महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे अस्थिरता वाढल्यास जागतिक तेलदर वाढण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम जगातील अर्थव्यवस्थांवर होतो. याशिवाय जागतिक राजकारणातही नव्या समीकरणांची निर्मिती होऊ शकते. रशिया आणि चीन यांसारखी राष्ट्रे या संघर्षाचा फायदा घेऊन आपले सामरिक हितसंबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करू शकतात. युक्रेन दीर्घकाळापासून रशियाच्या तुलनेत कमी शस्त्रे आणि कमी सैनिक असूनही कडवी लढत देत आहे. तरीदेखील शस्त्रांचा साठा आणि पुरवठा युद्धात महत्त्वाची भूमिका बजावतात. इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील या संघर्षाच्या सुरुवातीलाच हल्ल्यांची गती अत्यंत वेगवान राहिली आहे. दोन्ही बाजू ज्या वेगाने शस्त्रांचा वापर करत आहेत, त्या वेगाने त्यांचे उत्पादन होत नाही.

'इन्स्टिट्यूट फॉर नॅशनल सेक्युरिटी स्टडीज' (आयएनएसएस)च्या अंदाजानुसार, अमेरिका आणि इस्रायल यांनी आतापर्यंत दोन हजारांपेक्षा अधिक हल्ले केले आहेत. त्यात विविध प्रकारची शस्त्रे वापरण्यात आली आहेत. 'आयएनएसएस'च्या मते, इराणने आतापर्यंत ५७१ क्षेपणास्त्रे आणि १,३९१ ड्रोन डागले आहेत. त्यापैकी अनेक हवेतच पाडण्यात आले; मात्र या पातळीवरील लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे दोन्ही बाजूंसाठी कठीण ठरणार आहे. इराणचे शाहीद १३६ ड्रोन कमी उंचीवर उडतात आणि ते रडारवर ओळखणे कठीण असते. हे ड्रोन सुमारे २५०० किलोमीटर अंतरावर लक्ष्य भेदू शकतात.

पाश्चिमात्य देशांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की इराणकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या संख्येत आधीच घट दिसू लागली आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी शेकडो क्षेपणास्त्रे डागली गेली होती. ती आता कमी झाली आहेत. युद्धापूर्वी असा अंदाज व्यक्त केला जात होता, की इराणकडे दोन हजारांपेक्षा अधिक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. कोणताही देश आपल्या शस्त्रसाठ्याची अचूक संख्या सार्वजनिक करत नाही. कारण त्यामुळे शत्रूला माहिती मिळू शकते. अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी डॅन केन यांनी सांगितले, की युद्धाच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणात ८६ टक्के घट झाली आहे. 'युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड' (सेंटकॉम)च्या मते, केवळ मागील २४ तासांमध्येच प्रकारचे ड्रोन तयार करून ठेवले आहेत. त्याने रशियालाही हे तंत्रज्ञान दिले असून ते युक्रेनमध्ये त्याचा वापर करत आहेत. अमेरिकेनेही या डिझाइनची नक्कल केली आहे; मात्र जनरल केन यांच्या मते, संघर्षाच्या पहिल्या दिवसानंतर इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये ७३ टक्क्यांची घट झाली आहे. यावरून असे दिसते, की इराणला मोठ्या वेगाने हल्ले सुरू ठेवण्यात अडचणी येत आहेत. तथापि असेही शक्य आहे, की इराण आपला शस्त्रसाठा वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले कमी करत असावा; पण उत्पादन सुरू ठेवणे आता अधिक कठीण होऊ शकते, कारण अमेरिका आणि इस्रायलची लढाऊ विमाने आता इराणवर हवाई वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

इराणची बहुतेक हवाई संरक्षण व्यवस्था नष्ट झाली असून त्याची वायुसेना प्रभावी राहिलेली नाही. 'सेंटकॉम'च्या मते, युद्धाचा पुढील टप्पा आता इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन लाँचर, शस्त्रसाठे, शस्त्र उत्पादन कारखान्यांना लक्ष्य करण्यावर केंद्रित असेल. यामुळे अमेरिका आणि इस्रायलसाठी इराणची लढण्याची क्षमता कमकुवत करणे सोपे होऊ शकते; मात्र त्याचा संपूर्ण शस्त्रसाठा नष्ट करणे कठीण असेल. इराणचे क्षेत्रफळ फ्रान्सच्या तुलनेत जवळजवळ तीनपट आहे. त्यामुळे शस्त्रे जमिनीखाली लपवणे शक्य आहे. अलीकडील इतिहासाकडे पाहिले, तर केवळ हवाई हल्ल्यांद्वारे युद्ध पूर्णपणे जिंकणे शक्य होत नाही, असे पूर्णपणे नष्ट करता आलेले नाही. त्याचप्रमाणे येमेनमध्ये हुती बंडखोरही एका वर्षाच्या अमेरिकी बॉम्बहल्ल्यांनंतर टिकून राहिले. अमेरिकेकडे जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य आहे. तिच्याकडे इतर कोणत्याही देशापेक्षा पारंपरिक शस्त्रांचा मोठा साठा आहे; मात्र अमेरिकी सैन्य प्रामुख्याने महाग आणि अत्यंत अचूक मार्गदर्शित शस्त्रांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणात होते. ट्रम्प यांनी संरक्षण कंपन्यांची बैठक बोलावली आहे. त्यामुळे त्यांना उत्पादन वाढवता येईल. यावरून अमेरिकेच्या संसाधनांवरही काही प्रमाणात दबाव असल्याचे संकेत मिळतात. अमेरिका आता महागड्या आणि लांब पल्ल्याच्या 'टॉमहॉक क्रूज मिसाईल'ऐवजी तुलनेने स्वस्त शस्त्रांचा वापर करत आहे.

अमेरिकी वायुसेना आता 'जेडीएएम' बॉम्बचा वापर करत आहे. अमेरिका दर वर्षी सुमारे ७०० क्षेपणास्त्रे तयार करते. इराण सतत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागत राहिला, तर हा मर्यादित साठा वेगाने कमी होऊ शकतो. अमेरिकेकडे सुमारे १६०० पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा असू शकतो; परंतु अलीकडील काळात तो कमी झाला असावा. ट्रम्प यांनी पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा कमी करण्याचा धोका स्वीकारल्यास अमेरिका इराणविरुद्धच्या युद्धात अधिक काळ टिकू शकते; मात्र त्यामुळे प्रशांत महासागर क्षेत्रातील संभाव्य संघर्षाचा धोका वाढू शकतो.

–प्रा. जयसिंग यादव

# 'ये जंग क्यों है?'

ताजमहाल'(१९६३) ही तशी प्रेमकथा, पण साहिर लुधियानवी नावाच्या चिंतनशील कवीने १९६३ साली आलेल्या या चित्रपटात एक कमाल करून ठेवली. प्रेमकथेवरच्या सिनेमासाठी त्यांनी चक्क युद्धावरच एक जबरदस्त गाणे लिहून दिले. ते इतर गाण्यांइतके वाजले नसेल, लोकप्रियही झाले नसेल, पण साहिरची खरी गुणवत्ता आणि मानसिकता याच गाण्याने रसिकांसमोर ठेवली. एक तत्त्वचिंतक आणि विचारवंत कवी असे त्याचे रूप हे गाणे स्पष्ट करते. तसे ताजमहालचे 'जो वादा किया वो निभाना पडेगा..' हे रफीसाहेब आणि लतादीदींनी गायलेले अजरामर गाणे वार्षिक बिनाकात पहिल्या क्रमांकावर वाजले, 'सरताज गीत' बनले तर 'पाव छु लेने दो, फुलोंको इनायत होगी' या रोमँटिक द्वंदगीताला लोकप्रियतेत २३ व्या आणि 'जुर्मे उल्फतपे हमे लोग सजा देते हैं'ला त्यावर्षी ३० वा क्रमांक मिळाला. त्यामुळे 'ताजमहाल' लक्षात राहिला तो रोशन यांच्या कर्णमधुर संगीतासाठी आणि साहिर साहेबांच्या भावुक अर्थपूर्ण गाण्यांमुळे. सिनेमाने २ फिल्मफेयर पुरस्कार पटकावले. सर्वोत्तम गीतकार म्हणून साहिर आणि सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून रोशन साहेब. लतादीदींचेही नामांकन 'सर्वोत्तम गायिका' म्हणून झाले होते.

निर्माते होते ए. के. नडीयादवाला, दिग्दर्शक एम. सादिक आणि डौलदार राजेशाही संवादलेखन होते तबिश सुलतानपुरी यांचे. लेखक कमर जलालाबादी आणि प्रमुख भूमिकेत होते प्रदीपकुमार (राजकुमार खुर्रम, अर्थात शहाजहान), बीना राय (अर्जुमंद बानो म्हणजेच मुमताज), रहमान (जहांगीर), जीवन (शहजादा शहरयार), वीणा (नूरजहा उर्फ मेहरुनिस्सा), जबीन जलील, (लाडली बानो) आणि हेलन. बादशाहा जहांगीरचा मुलगा शहजादा खुर्रम उर्फ शहाजहानची आग्र्याच्या 'मीना बझार'मध्ये मुमताजशी नजरानजर होते आणि दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात.




मात्र जहांगीराची पत्नी नूरजहाला त्याचे लग्न लाडलीशी व्हावे असे वाटत असते. नूरजहां मुमताजच्या प्रेमात अडथळे आणण्यासाठी कारस्थाने करते. शहाजहाला मुद्दाम युद्धावर पाठवते. शेवटी युद्धात जखमी झालेल्या आपल्या मुलाची तिने केलेली सेवा आणि तिचे प्रेम बघून जहांगीर दोघांचे लग्न लावून देतो अशी ही कथा. साहिरजींनी युद्धाच्या एकंदरच व्यर्थतेवर लिहिलेले हे गाणे म्हणजे एका निरागस प्रेमिकेने ईश्वराकडे केलेली कळकळीची प्रार्थना आहे. आज जगभर पेटलेली महाभयंकर युद्धे, सगळीकडे पसरलेला परस्पर द्वेष आणि हिंसा पाहता हे गाणे या सर्वांवरचे एका कवीचे सखोल चिंतन ठरते. सहिष्णू भारतीय मानसिकतेशी एकरूप झालेले असूनही हे गाणे तितकेसे लोकप्रिय झाले नाही, कारण त्यात वापरलेली उर्दू. अनेक अवघड शब्दांचा अर्थ समजणे जड गेल्याने साहिरच्या इतक्या अनमोल रचनेचे महत्त्व रसिकांच्या लक्षातच आले नसावे. लढाईवर जबरदस्तीने पाठवले गेलेल्या शहाजहानसाठी मुमताज प्रार्थना करते असे दृश्य होते. साहीरने पहिल्याच ओळीत एक वेगळा विचार मांडला होता. शब्द होते –

''ख़ुदा-ए-बर्तर तेरी ज़मींपर, ज़मींकी ख़ातिर ये जंग क्यूँ है? हर एक फ़त्ह-ओ-ज़फ़रके दामनपे, ख़ून-ए-इंसानका रंग क्यूँ है?''

सर्वशक्तिमान परमेश्वरा, हे जग, ही पृथ्वी तुझीच ना? मग या जमिनीवर जमिनीसाठी युद्धे का होतात? (इथे साहिरवर बायबलमधील एका वचनाचा संस्कार दिसून येतो. 'लेवीय' या भागातले २५व्या अध्यायातील वचन सांगते 'सर्व भूमी ईश्वराची आहे, तिच्यावर मर्यादित काळासाठी वावरणारा माणूस हा केवळ एक प्रवासी आहे.' असेच कुराणातील सुरा निसाच्या आयत १३१ मध्ये सांगितले आहे. आणि खरेच नाही का? कालपर्यंत इराणचे सर्वेसर्वा असलेले खामेनीई आज कुठे आहेत? सर्व जगाची भूमी जिंकल्याचा दावा करणारा सिकंदर, हिटलर, अनेक देश पादाक्रांत करत भारतावर चालून आलेले मोगल बादशहा कुठे आहेत? सगळे प्रवासी 'निजधामालाच' निघून गेले ना?

पुढे मुमताज खुदाला विचारते 'जमीन तुझी, आम्हीही तुझीच लेकरे मग मालकीहक्काचा प्रश्न का यावा? दुसऱ्याची जमीन हडपण्यासाठी निर्घृण खून करण्याची, निष्पाप रक्त वाहवण्याची प्रथा का पडली? इतरांचे जीव घेऊन आपला विजय साजरा करण्याची परंपरा का पडली रे, परमेश्वरा?

''ज़मीं भी तेरी है हम भी तेरे' ये मिलकियतका सवाल क्या है? ये क़त्ल-ओ-ख़ूँका रिवाज क्यूँ है? ये रस्म-ए-जंग-ओ-जिदाल क्या है?'' मुमताज, अर्थात साहिर साहेबांच्या कल्पनेतली मुमताज विचारते, 'परमेश्वरा, ज्यांना जगातल्या सगळ्याच गोष्टी हव्या आहेत त्यांची मने मात्र इतकी संकुचित का असतात?

'जिन्हें तलब है जहानभरकी, उन्हींका दिल इतना तंग क्यूँ है? ख़ुदा-ए-बर्तर तेरी ज़मींपर, ज़मींकी ख़ातिर ये जंग क्यूँ है?'

युद्ध अटळ आहे हे लक्षात आल्यावर चिंताग्रस्त मुमताज देवाला विनवणी करते, 'देवा निदान गरीब आया-बहिणींना तरी सुरक्षित ठेव. त्यांची अब्रू राख, त्यांना शांतीने जगू दे. ज्या योद्ध्यांना तू ताकदवान बनवलेस त्यांच्या हृदयात निदान विवेकाचा प्रकाश पाड.

'ग़रीब माओं शरीफ़ बहनोंको, अम्न-ओ-इज़्ज़तकी ज़िंदगी दे. जिन्हें अता की है तूने ताक़त, उन्हें हिदायतकी रौशनी दे.'

पण परमेश्वरा, तू जन्माला घातलेल्या यःकश्चित मानवाच्या मनात इतका गर्व कशाला, त्याच्या मनावर मीपणाचा एवढा गंज का चढतो? त्याला सत्य का दिसत नाही? 'सरोंमें किब्र-ओ-गुरूर क्यूँ है, दिलोंके शीशे ये रंग क्यूँ है? ख़ुदा-ए-बर्तर तेरी ज़मींपर, ज़मींकी ख़ातिर ये जंग क्यूँ है?'

दक्षिणेतले प्रदेश जिंकायला गेलेल्या प्रियकरासाठी प्रार्थना करताना मुमताज म्हणते, 'देवा, हे लोक तर स्वतःहून मृत्यूला भेटायला निघाले आहेत. तरी तू त्यांना परत येण्याची मुभा ठेव. त्यांच्यासाठी सुरक्षित परतण्याचा मार्ग खुला ठेव. मानवी मनातल्या प्रेमभावनेची बाग अशी उजाड करू नकोस. प्रेमासारख्या नाजूक गोष्टीला तूच सहारा दे.'

तिला पुन्हा समाजात रूढ असलेली एक गोष्ट खटकते. परमेश्वराला ती विचारते, 'या सुंदर जगात प्रेमाचा उत्सव करायचा सोडून माणसे नेहमी आपल्याच वेगवेगळ्या शस्त्रात्रांनी आपल्याच प्रजातीचा संहार करून मिळवलेला विजय का साजरा करतात?

'कज़ाके रस्तेपे जानेवालोंको, बचके आनेकी राह देना, दिलोंके गुलशन उजड़ न जाए, मुहब्बतोंको पनाह देना, जहाँमें जश्न-ए-वफ़ाके बदले, ये जश्न-ए-तीर-ओ-तफ़ंग क्यों है?

आजचे जगभराचे भयंकर चित्र पाहून पुन्हा लक्षात येते कवी किती व्यापक आणि मूलभूत विचार देत असतात आणि समाज ते किती हट्टीपणे नाकारत असतो. कदाचित म्हणूनच जर्मन तत्त्वज्ञ जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल यांनी म्हटले होते, 'अनुभव आणि इतिहास आपल्याला इतकेच शिकवतो की कोणतेच सरकार आणि देश इतिहासापासून काहीही शिकलेले नाहीत.'

**– श्रीनिवास बेलसरे**

***

# नांदेड शहराला क्षयमुक्त करण्यासाठी सहकार्य करा-महापौर सौ.कविता संतोष मुळे

## क्षयरोग जनजागृतीसाठी पालिकेच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

नांदेड - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या क्षयमुक्त भारत संकल्पनेला गती देण्यासाठी आणि नांदेड शहराला पूर्णपणे टीबीमुक्त करण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत नांदेडकरांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर सौ.कविता संतोष मुळे यांनी केले आहे. ''स्वच्छ आणि सुंदर नांदेडसोबतच आरोग्यदायी नांदेड हे आमचे ध्येय आहे. प्रत्येक नागरिकाच्या सहभागातूनच आपण शहराला क्षयमुक्त करू शकू,'' असा विश्वास यावेळी महापौरांनी व्यक्त केला आहे. यावेळी पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांची सुद्धा प्रमुख उपस्थिती होती.

नांदेड शहर हे क्षय मुक्त करण्यासाठी सर्व नांदेड वासियांनी क्षय रोगाची तपासणी करून नांदेड हे क्षयमुक्त करण्याच्या दृष्टीकोणातुन जन भागीदारी च्या संकल्पनेतून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने आज दि.२४ मार्च हा जागतिक क्षयरोग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी एका भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महपौर व प्रमुख पाहुणे यांनी महात्मा फुले पुतळा येथून निघणाऱ्या रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली त्याचप्रमाणे या प्रसंगी मान्यवरांनी व उपस्थित सर्व आरोग्य कर्मचारी यांनी टीबी मुक्त व क्षयरोग निर्मूलनाची शपथ घेऊन सामुहिक स्वाक्षरी मोहीमेचा उपक्रम राबविण्यात आला.

सदरील रॅली सकाळी ठीक ८.३० वाजता आय.टी.आय. जवळील महात्मा फुले यांच्या पुतळया पासून ते जंगमवाडी दवाखाना या मार्गावर काढण्यात आली. रॅलीमध्ये सहभागी वैद्यकीय अधिकारी, सुपरवायझर, MPW, ANM, GNM, व सर्व आशा वर्कर तसेच जी.डी.गोएंका हेल्थकेअर अकॅडमी व स्वामी विवेकानंद नर्सिंग स्कूल नांदेड चे शिक्षक व सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, सहभागी झाले होते. या सर्वांनी रॅलीमध्ये क्षयरोग निर्मूलनाचे फलक हातात धरून घोषणांच्या माध्यमातून जनजागृती केली.

याप्रसंगी शहरातील जास्तीत जास्त क्षय रुग्णांना शोधून उपचारासाठी आणण्याचे काम करणारे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉ.मृत्युंजय महिंद्रकर, डॉ.भरत तोष्णीवाल, डॉ.समीर कोटलवार यांचा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच नांदेड शहरामध्ये आरोग्य सेवा देणाऱ्या उत्कृष्ट आशा ताई , विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचारी विवेकानंद हाळीकर, रवींद्रकुमार कावडे व कृष्णा भूसेवाड यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास महापौर कविता संतोष मुळे, पालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे उपमाहापौर दिपकसिंह रावत, सभागृहनेता ॲड.महेश कनकदंडे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवर, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य




अधिकारी डॉ. हनुमंत रिठे,डॉ.प्रतिमा कदम, उपवैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बालाप्रसाद कुंटूरकर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.मो.बदीयोद्दिन यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

## नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव तपासून आवश्यक दुरुस्ती करुन घ्यावी-जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** – भारतीय लोकशाही प्रक्रियेचा कणा मानल्या जाणाऱ्या मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाच्या वतीने ''मतदार याद्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम'' हाती घेण्यात आला आहे. लवकरच म्हणजेच माहे एप्रिल २०२६ मध्ये महाराष्ट्रात देखील हा कार्यक्रम सुरु होण्याची शक्यता आहे. यासाठी प्रशासन सज्ज असून परभणी जिल्हयातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य करावे व मतदार यादीत आपले नाव तपासून आवश्यक दुरुस्ती करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

मतदार याद्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार व पत्रकार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की,



हा कार्यक्रम केवळ नोंदणीपुरता मर्यादित नसून, स्वच्छ, पारदर्शक आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होणे ही काळाची गरज आहे. मतदार याद्या विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजे मतदार यादीचे शुद्धीकरण आहे. या कार्यक्रमातंर्गत दुबार नावे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नोंद वगळून तसेच अपूर्ण किंवा अस्पष्ट छायाचित्रे दुरुस्त करून पात्र नागरिकांची नावे समाविष्ट केली जाणार आहेत. एकही पात्र मतदार वंचित राहू नये आणि एकही अपात्र नाव यादीत राहू नये,'' हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नागरिकांनी कोणतीही भीती बाळगू नये. स्वतः पुढाकार घेऊन मतदार यादीत आपले नाव तपासावे व आवश्यक ती दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाकरीता मतदारांची मॅपींग ज्यामध्ये सन २००२ च्या अंतिम मतदार यादीतील मतदारांचे सन २०२५ च्या मतदार यादीतील मतदारांशी मॅपिंग करणे, तसेच सन २००२ च्या मतदार यादीमध्ये नाव नसलेल्या मतदारांचे त्यांच्या आई-वडील, वडीलांकडील आजी-अजोबा यांचेशी ऑनलाईन बि.एल.ओ. ॲपमध्ये मॅपिंग करण्याची कार्यवाही चालु असून आज रोजी परभणी जिल्ह्यातील मॅपिंगचे काम ६६.०५ टक्के झालेले आहे. सदर कामामध्ये परभणी जिल्हा राज्यामध्ये आठव्या क्रमांकावर आहे. तर जिल्हयामध्ये पाथरी उपविभाग प्रथम क्रमांकावर असुन सोनपेठ तहसिलचे सर्वात जास्त म्हणजेच ७८.०० टक्के काम झालेले आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त निर्देशाचे अनुषंगाने सध्या सुरु असलेल्या पूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी तसेच पुर्व तयारीसाठी करावयाच्या कामा संदर्भात जिल्ह्यातील ४ मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ९ सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार, सर्व गट विकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी, सर्व गटशिक्षण अधिकारी, ९ निवडणूक नायब तहसिलदार, १६३ बीएलओ यांचे पर्यवेक्षक यांचे जिल्हास्तरावर तीन प्रशिक्षणे झालेली आहेत. त्याच प्रमाणे १६२३ बीएलओ (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) यांना तहसिल स्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे.

मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाकरीता मतदारांची मॅपींग करण्याच्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्षाच्या जिल्हाध्यक्ष / पदाधिकारी यांची बैठक घेवुन जिल्हयातील १६२३ मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांच्या नेमणुका करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे मतदार यादीमध्ये असलेल्या दुबार मतदार, यादीतील अस्पष्ट व मानवी नसलेल्या छायाचित्रांची पडताळणीबाबत करावयाची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने प्रात्याक्षिकाव्दारे दाखविण्यात आली. मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करणेकरीता १२०० पेक्षा जास्त मतदार एका मतदान केंद्राला जोडले जाणार नाही, याबाबत दक्षता घेऊन सुसुत्रिकरणाचे प्रस्तावत तयार करण्याबाबत सुचना देण्यात आल्या.

भारत निवडणूक आयोगाने बीएलओ ॲपमध्ये मतदारांना त्यांच्याशी संबंधित बीएलओ यांना कॉल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असून कॉल बुक झाल्यानंतर कॉल बुक केलेल्या अर्जदारास संपर्क साधून प्रतिसाद देण्याकरीता कॉल बॅक करण्याची कार्यपध्दत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाकरीता () करीता मोठ्या प्रमाणात कर्मचा-यांच्या नियुक्त्या कराव्या लागणार असून ज्यामध्ये बीएलओ यांना सहाय्य करण्यासाठी गाव पातळीवरील कर्मचारी, सर्व कार्यालयातील संगणक ऑपरेटर व इतर कर्मचारी लागणार असल्याने सदरील कर्मचारी यांच्या नियुक्त्या करुन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. सर्व राजकीय पक्षांनी १६२३ मतदान केंद्रावर मतदान केद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांच्या नेमणुका करण्याबाबत त्यांनी आवाहन केले. त्याचप्रमाणे प्रत्येक मतदाराने जागरुक राहून आपले नावाचे मॅपींग करुन घेण्याबाबत आवाहन केले. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराची नोंद अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून आपला मतदानाचा अधिकार सुनिश्चित करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.



## परभणी येथे जिल्हा उद्योजक मेळावा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी, दे आसरा फाउंडेशन व कमलताई जामकर महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कमलाताई जामकर महिला महाविद्यालय येथे उद्योजक मेळावा (दि.२३ मार्च) संपन्न झाला.

मेळाव्याचे उद्घाटन सेल्स व ग्रोथ एक्सपर्ट राहुल लिमये व उद्योजक विशाल सरदेशपांडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व मराठी विभागप्रमुख अरुण पडघन होते. यावेळी दे आसरा फाउंडेशनच्या स्नेहा ननावरे, मनीष भुतडा तसेच कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त प्र.सो. खंदारे यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

स्नेहा ननावरे यांनी विशाल सरदेशपांडे यांच्याशी संवाद साधला. या चर्चेत त्यांनी उद्योग उभारणीतील स्वतःचे अनुभव, भांडवल गुंतवणूक, आर्थिक नियोजन तसेच अडचणींवर मात करण्याचे मार्ग याबाबत मार्गदर्शन केले. परभणीसारख्या कृषिप्रधान जिल्ह्यात उद्योगांना चालना देण्यासाठी आवश्यक बाबींवरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमातील प्रश्नोत्तर सत्रात उपस्थित उद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध शंकांचे निरसन करून घेतले.

राहुल लिमये यांनी ''उद्योग का करावा?'' या विषयावर मार्गदर्शन करत सूक्ष्म व लघु उद्योजकांना भेडसावणाऱ्या प्रारंभीच्या अडचणी, मार्केटिंग प्रणालीची उभारणी आणि भांडवल उभारणीच्या विविध पर्यायांबाबत सविस्तर माहिती दिली. प्राचार्य पडघनही यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात सहायक आयुक्त प्र.सो. खंदारे यांनी मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन प्रा. माधुरी देशमुख यांनी केले.

# सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य

## 'गंगाधरराव फडणवीस डायग्नोसिस सेंटर'चा लोकार्पण सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

नागपूर –अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत समाज सेवेला प्राधान्य देऊन लोकसेवक म्हणून ज्यांना ओळखले जाते अशा गंगाधरराव फडणवीस यांच्या नावाने सुरू झालेल्या नव्या आरोग्य सेवेचा शुभारंभ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला, या सेवा प्रकल्पातून सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सोमलवाडा परिसरात श्री सिद्धिविनायक सेवा फाउंडेशन तर्फे अत्याधुनिक सुविधायुक्त गंगाधरराव फडणवीस डायग्नोसिस सेंटर उभारण्यात आले असून या सेवेचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता, सर्वसामान्यांना अत्याधुनिक सुविधांचा लाभ परवडेल अशा दरात उपलब्ध होतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

लोकार्पण सोहळ्यास सरिता गंगाधर फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अर्थ व नियोजन मंत्री ॲड आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे खासदार मायाताई मनाते जीवनाते लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डायग्नोसिस सेंटरला गंगाधरराव फडणवीस यांचे नाव दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अतिशय आधुनिक अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देताना सर्व सामान्यांना या सेवाचा लाभ घेता यावा हा प्रमुख उद्देश आहे. त्याच्यामुळे जो काही खर्च येतो तेवढ्या खर्चापुरतं लोकांकडून शुल्क घेतलं गेलं पाहिजे आणि ज्या ज्या गोष्टी सरकारच्या वेगवेगळ्या योजनांमध्ये उपलब्ध आहेत त्या करिता शुल्कच न घेता या मोफत झाल्या पाहिजेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जन आरोग्य योजना आणि महाराष्ट्र सरकारने महात्मा फुले जन आरोग्य योजना सुरू केली आणि या दोन योजनांच्या माध्यमातून आता जवळपास राज्यातील शंभर टक्के लोकांना या योजनेचा लाभ मिळत आहे, राज्यात साडेचार हजार हॉस्पिटल च्या माध्यमातून सर्व लोकांना मोफत उपचार उपलब्ध करून दिलेले आहेत असे ही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी माजी आमदार स्वर्गीय गंगाधरराव फडणीस यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सामाजिक कार्याला सुरुवात केली त्यांनी उपमहापौर म्हणून केलेले कार्य दिशादर्शक असेच आहे त्यांच्या नावाने सुरू झालेल्या डायग्नोसिस सेंटर मधून सर्वसामान्यांना परविन अशा



वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत गरिबांना जीवनदान देणारे मंदिर म्हणून ओळख निर्माण व्हावी तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

गंगाधरराव फडणवीस डायग्नोक्सिस सेंटरचे लोकार्पण करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहनजी भागवत म्हणाले की सार्वजनिक कार्यकर्ता कसा असावा राजकीय कार्यकर्ता कसा असावा याचं उदाहरण त्यांनी आपल्या कृतीने घालून दिले आहे.. प्रामाणिकपणे निस्वार्थ बुद्धीने एक भव्य लक्ष डोळ्यासमोर ठेवून ते काम करत होते त्याच्यामुळे त्यांनी केलेल्या कामाला कधी स्वार्थाचा स्पर्श झाला नाही.

आरोग्य सुविधेच्या या सेवा प्रकल्पला शुभेच्छा देताना डॉ भागवत यांनी या प्रकल्पपापासून स्पुर्ती घेउन गरीबाच्या आरोग्य सेवेला वाहिलेले अनेक प्रकल्प सुरु व्हावेत अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. प्रारभी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते आरोग्य सेवा प्रकल्पाचा विधीवत शुभारंभ झाला या डायग्रोसी सेंटरमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांची यावेळी त्यांनी पाहणी केली श्री सिद्धिविनायक सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी यांनी प्रास्ताविकात येथे उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सुविधांची माहिती दिली सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात सर्व सुविधा येथे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.


दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
परभणी-हिंगोली व नांदेड जिल्हयासाठी
पत्रकार पाहिजेत
महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.
नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी
परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा
हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट
संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# सरकारी नियमांना 'वाढदिवसाचा' विळखा! आरोग्य कार्यालयातच 'केक'चा जल्लोष; शिस्तीचा बळी कोण?

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट –** शासनाच्या स्पष्ट आदेशांना हरताळ फासत किनवट येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातच वाढदिवसाचा धुमधडाका रंगला असून, सरकारी शिस्तीचा अक्षरशः 'केक' कापण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जनतेच्या सेवेसाठी असलेल्या कार्यालयातच खासगी कार्यक्रम साजरा होत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.



महाराष्ट्र शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये वाढदिवस, निरोप समारंभ आणि इतर खासगी कार्यक्रमांवर कडक बंदी घातलेली असताना, जलधारा येथील एका गटप्रवर्तकाचा वाढदिवस थेट कार्यालयात साजरा करण्यात आला. केक कापणे, फोटोसेशन, जल्लोष सगळं काही सरकारी वेळेत आणि कार्यालयीन परिसरातच! मग प्रश्न असा नियम फक्त कागदावरच का?

'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९' नुसार अशा प्रकारांना स्पष्टपणे शिस्तभंग मानले जाते. तरीदेखील हा कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या मौनसंमतीने पार पडल्याची माहिती पुढे येत आहे. यामुळे "वरपासूनच मोकळीक असेल, तर खालच्या स्तरावर शिस्त कशी राहणार?" असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

एकीकडे रुग्ण उपचारासाठी धाव घेत आहेत, तर दुसरीकडे अधिकारी-कर्मचारी 'सेलिब्रेशन मोड'मध्ये रमल्याचे चित्र पाहून नागरिक संतप्त झाले आहेत. "कार्यालय कामासाठी की पार्टीसाठी?" असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांचे स्पष्ट म्हणणे आहे की, "सामान्य माणूस आपल्या कामासाठी तासन्तास वाट पाहतो, आणि अधिकारी कार्यालयाला पार्टी हॉल बनवतात, हे अजिबात सहन केले जाणार नाही. संबंधितांवर तात्काळ निलंबनाची कारवाई झालीच पाहिजे!"

या प्रकरणामुळे आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर आणि गांभीर्यावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शासकीय वेळेचा दुरुपयोग, नियमांची उघडपणे पायमल्ली आणि प्रशासनाची निष्क्रियता या तिन्ही गोष्टी आता जनतेच्या संतापाचे कारण ठरत आहेत.

दरम्यान, जिल्हा आरोग्य प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे की, प्रशासन 'केक'च्या या प्रकरणावर खरंच कारवाई करते की पुन्हा एकदा दुर्लक्षाचा 'गोड' मार्ग स्वीकारते!



## महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी विरेंद्रसिंघ गाडीवाले तर महिला व बालकल्याण सभापतीपदी सदिच्छा सोनी पाटील व उपसभापतीपदी निरंजना लांडगे यांची निवड

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**नांदेड –** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक मंगळवार दि.२४.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिकेच्या स्थायी समिती बैठक कक्षात पार पाडण्यात आली. भाजपचे विरेंद्रसिंघ जगतसिंघ गाडीवाले यांची स्थायी समितीच्या सभापतीपदी निवड झाली असुन महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी भाजपाच्या सदिच्छा सोनी पाटील तर उपसभापतीपदी निरंजना राजु लांडगे यांची निवड झाली आहे. यावेळी पिठासिन अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांची उपस्थिती होती. या निवडणूक प्रक्रियेसाठी सर्व स्थायी समिती सदस्य व महिला व बालकल्याण समितीतील सदस्य उपस्थित होते.

प्रारंभी प्राप्त नामनिर्देशनाच्या छाननीनंतर स्थायी समिती सभापती पदासाठी केवळ एकच अर्ज प्राप्त असल्याने व तो वैद्य ठरल्याने वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारास अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात आला. परंतु उमेदवाराने माघार घेतली नसल्याने पिठासिन अधिकारी यांनी भारतीय जनता पक्षाचे विरेंद्रसिंघ जगतसिंघ गाडीवाले यांची बिनविरोध निवड झाल्याचे जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डीले यांनी घोषीत केले.

त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समितीच्य सभापती पदासाठी केवळ एकच अर्ज प्राप्त असल्याने व तो वैद्य ठरल्याने वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारास अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात आला. परंतु उमेदवाराने माघार घेतली नसल्याने पिठासिन अधिकारी यांनी भारतीय जनता पक्षाच्या सदिच्छा सोनी पाटील यांची तर उपसभापतीपदी निरंजना राजु लांडगे यांची निवड झाल्याचे जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डीले यांनी घोषीत केले. निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा जिल्हाधिकारी तथा पिठासिन अधिकारी राहुल कर्डीले व पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# श्री रेणुकादेवी महाविद्यालयाचा 'खाकी'मध्ये डंका!

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**माहूर –** बळीराम पाटील मिशन, मांडवी संचलित श्री रेणुकादेवी महाविद्यालय, श्रीक्षेत्र माहूर येथील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा यशाची नवी उंची गाठत 'खाकी'मध्ये दमदार एन्ट्री केली आहे. कु. श्रद्धा चुगडे, दिशा तिलेवाड आणि विशाल वानखेडे या तिघांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर पोलीस दलात यश संपादन करून महाविद्यालयासह संपूर्ण माहूर तालुक्याचा नावलौकिक उंचावला आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश मिळवू शकतात, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे. त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून स्पर्धा परीक्षांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत आहे.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रफुल्लजी राठोड यांनी सांगितले की, "आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पोलीस दलात स्थान मिळवणे ही संपूर्ण शैक्षणिक परिवारासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे की, जिद्द आणि योग्य दिशा असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही."

सचिव सौ. संध्याताई राठोड, प्राचार्य डॉ. विलास पाटील तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नवनियुक्त पोलीस जवानांचे हार्दिक अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शंभर दिवसीय क्षय रुग्ण शोध मोहिमेस सहकार्य करावे -जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सतीश कोपुरवाड

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** शंभर दिवसीय क्षयरुग्ण शोध मोहिमेस आज २४ मार्च , जागतिक क्षयरोग दिनापासून सुरुवात झाली असून सदर मोहिमेत जिल्ह्यातील अति जोखीमग्रस्त भागातून विशेष मोहीमेअंतर्गत संशयीत क्षय रुग्णांना शोधून यांचे थुंकी नमुने घेण्यात येणार आहेत. यातून निदानीत होणाऱ्या क्षयरूग्णांना क्षयरोग प्रतिबंधीत औषधोपचाराने रोगमुक्त करणे उद्दिष्ट आहे . सदर मोहिमेत नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश कोपुरवाड यांनी केले.




जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्हा क्षयरोग केंद्र नांदेड येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमांतर्गत डॉ सतीश कोपुरवाड हे बोलत होते.

ते पुढे मार्गदर्शन करतांना असेही म्हणाले की , संशयित क्षय रुग्ण म्हणजे ज्या व्यक्तीस दोन आठवडे व पेक्षा जास्त दिवसाचा खोकला , रात्रीचा येणारा हलकासा ताप , वजनात घट होणे , भूक मंदावणे ,थुंकी वाटे रक्त पडणे असे असल्यास सदर व्यक्तीने आपल्या नजीकच्या सरकारी दवाखान्यात जाऊन आपल्या थुंकीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे असे सांगितले.

वैद्यकीय अधिकारी डॉ.अमृत चव्हाण यांनी याप्रसंगी सांगितले की क्षयरुग्णाने पूर्ण कालावधीचा औषधोपचार घेणे आवश्यक असून अर्धवट औषधोपचार घेतल्यास सदर रुग्ण एमडीआर व एक्स डी आर सारख्या घातक क्षयरोगाला आमंत्रण देतो हे उदाहरणे देवून पटवून दिले. डॉ. गणपत मीरदुडे यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर १०० दिवसीय क्षयरुग्ण शोध मोहिम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली ,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख ,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे . जागतिक क्षयरोग दिन कार्यक्रमास जिल्हा क्षय रोग केंद्र येथील अधिकारी कर्मचारी आदि उपस्थित होते.

# 'विकसित भारत'च्या उभारणीत अंगणवाडी सेविकांचे योगदान मोलाचे; शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे-राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

आत्ताच एक्सप्रेस

**सातारा –** विकसित भारताचे स्वप्न साकारण्यामध्ये अंगणवाडी सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सुसंस्कृत पिढी घडवण्यासोबतच गरोदर मातांची काळजी घेण्याचे पवित्र कार्य त्या करत आहेत. त्यांच्या सर्व रास्त मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले.

भारतीय मजदुर संघ संलग्न महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी संघ यांचे तिसरे वार्षिक प्रदेश अधिवेशन महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, मंगळवार पेठ सातारा येथे संपन्न झाले. या प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, नगरसेविका सिद्धी पवार, भारतीय मजदूर संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल ढुमणे, महासंघाच्या सचिव संगीता श्रीवास्तव, सरचीटणीस किरण मिलगीर,श्रीपाद कुटासक, जिल्ह्यांतून आलेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होत्या.

अंगणवाडी सेविकांच्या मागण्यांबाबत मंत्रालयात विशेष बैठक संपन्न झाली आहे. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, सेविकांच्या हिताचे सकारात्मक बरेच निर्णय घेण्यात आले, असे सांगून राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या. अंगणवाडी सेविकांच्या कामाचा व्याप सुलभ करण्यासाठी शासनाकडून त्यांना नवीन मोबाईल संच देण्यात येत आहेत. यामुळे गरोदर मातांची नोंदणी, लसीकरण आणि इतर प्रशासकीय कामे ऑनलाइन पद्धतीने करणे सोपे होणार आहे.



आज होत असलेल्या अधिवेशनामध्ये अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. या चर्चेतून निघणारे निष्कर्ष आणि मागण्यांवर शासन तातडीने आणि सकारात्मकतेने विचार करेल, असे आश्वासनही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यावेळी दिले. अंगणवाडी सेविका सुसंस्कृत व सुदृढ पिढी घडवण्याचे अमूल्य कार्य करीत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अंगणवाडी सेविकांच्या प्रश्न सोडण्यावर विशेष लक्ष आहे. त्यांच्या अनेक मागण्या आतापर्यंत पूर्ण करण्यात आल्या असून, उर्वरित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे बोर्डीकर यांनी सांगितले.

## अत्याचारग्रस्तांच्या १४ वारसांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते नोकरी आदेशाचे वितरण

आत्ताच एक्सप्रेस

**परभणी –** जिल्ह्यातील १४ अत्याचार पिडीत व्यक्तींच्या वारसदारांना सामाजिक न्याय विभागात मुला/मुलींची शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतिगृह व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, बुलढाणा, अकोला, बीड, अमरावती, अहिल्यानगर, हिंगोली या जिल्ह्यांमध्ये शिपाई व सफाईगार या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते आज नियुक्तीचे आदेश संबंधितांना वितरीत करण्यात आले.

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ (सुधारित अधिनियम, २०१५) व सुधारीत नियम, २०१६ अंतर्गत अनुसूचित जाती व जमातीच्या ज्या व्यक्तीचा खून किंवा मृत्यु झाला असेल अशा दिवंगत व्यक्तीच्या एका पात्र वारसास शासकिय / निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या नियुक्ती आदेश वितरणप्रसंगी समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजु एडके, सहाय्यक लेखाधिकारी संजय पाटसकर, समाजकल्याण निरीक्षक तुषार दवणे, प्रकाश कांबळे आदींसह पीडितांचे नातेवाईक उपस्थित होते.

# किनवटमध्ये सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची सामाजिक एकतेची साक्ष

## तीन जोडपी विवाहबद्ध; महिलांच्या सक्षमीकरणासाठी साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट –** समाजात समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा किनवट येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किनवट यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाने सामाजिक बांधिलकीची जपणूक करत एक आदर्श निर्माण केला आहे.

रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी आयोजित या सोहळ्यात विविध समाजघटकांतील वधू-वरांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे एका दिव्यांग जोडप्यासह एकूण तीन जोडपी विवाहबंधनात अडकली. हा क्षण उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. नवविवाहित वधू-वरांना आयोजक प्रा. जयश्री भरणे यांच्या हस्ते सोन्याचे मणी-मंगळसूत्र आणि चांदीची जोडवी भेट देऊन नव्या आयुष्याच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. याचबरोबर कार्यक्रमात सामाजिक जबाबदारीचे भान जपत विधवा महिलांना पाच शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले, तर गरजू महिलांना शंभर साड्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळकटी मिळणार असून, समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले. परिचय मेळाव्यासाठी वसमत, हिंगोली, नांदेड, परभणी, गंगाखेड, यवतमाळ तसेच आदिलाबाद येथून मोठ्या संख्येने वधू-वर व त्यांच्या कुटुंबीयांनी उपस्थिती लावली. त्यामुळे कार्यक्रमाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष व्यंकटरावजी नेमानीवार होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये के. मूर्ती, सौ. नंदिनी टारपे, नगरसेवक राम नेमानीवार, निसार भाटी, अन्वर मिर्झा, गणेश दासरे, ॲड. मिलिंद सपे, राजू टारपे, बबन वानखेडे, ॲड. दिव्या पाटील, बबिता भंडारे, सुजाता





पोहरे, लक्ष्मीकांत मुंडे, अनिल भंडारे, मोईस खान, कामराज माडेपल्लीवार, नसीर तगाले, गंगाधर कदम, आशाताई कदम, उषा वाडवे, योगेश डहाळे, बा.रा. कदम, मधू वावलकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. उत्तम कानिंदे यांनी सुरेखरीत्या केले. प्रा. सुरेश पाटील व प्रतिभा पाटील यांच्या सुमधुर गायनाने वातावरणात आनंदाची उधळण झाली. प्रास्ताविक करताना आयोजक प्रा. जयश्री भरणे यांनी महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी तसेच विधवा व दिव्यांग घटकांच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813